# ग्रीन व्हायटल्स बायोटेक

**कंपनीची माहिती:**

कृषीक्षेत्रातील सूक्ष्मजीवांचे योगदान या विषयावर अभ्यासपूर्ण संशोधन करून विविध उत्पादने आणि शोध या क्षेत्रात काम करणारी ग्रीन व्हायटल्स बायोटेक एक व्यावसायिक संस्था आहे. २०१५ साली पुण्याजवळच्या रांजे या गावात स्थापन झालेल्या या कंपनीचे मालक श्री. अमेय महेंद्र रांजेकर हे स्वतः सूक्ष्मजीव विज्ञान शाखेचे पदवीधर असून आपले पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांच्या स्टार्टअप इंडिया आणि मेक इन इंडियाच्या कल्पनेतून प्रेरीत होऊन या क्षेत्रात उतरले आहेत. कृषीक्षेत्रात जैव खते आणि जैविक नियंत्रण यांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने आम्ही प्रयत्नशील आहोत.

निसर्गात आढळणारे विविध सूक्ष्मजीव आणि त्यांच्या चयापचय प्रक्रिया यांचा वापर करून प्रत्यक्ष वापरले न जाणारी निरनिराळी मूलद्रव्ये त्यांच्या वापरण्याजोग्या अवस्थेत बदल्ली जातात, हि जैविक खते नैसर्गिक असल्यामुळे पर्यावरणपूरक आणि शेतकऱ्यांसाठी स्वस्त, सहज, सोपा पर्याय ठरू शकतात. ठराविक सूक्ष्मजीवांचे १०$^{७}$ ते १०$^{९}$ प्रती मिली लिटर इतक्या प्रमाणात मिश्रण जैविक खतात केलेले असते. या खतांमुळे हवेतील नत्र स्थिरीकरण शक्य होते. शिवाय फोस्फरस, झिंक, कॉपर, आयर्न, सल्फर आणि मूलद्रव्ये विद्राव्य अवस्थेत रुपांतरीत केली जातात. या कार्यांत अॅझोटोबॅक्टर, रायझोबियम, फोस्फेट विद्राव्य सूक्ष्मजीव, पोटॅश सक्रीय कारक सूक्ष्मजीव, अॅसिटोबॅक्टर, इ. जीवाणूंचा समावेश होतो.
याच सूक्ष्मजीवाणूंचा वापर करून आम्ही द्रवरूप खते / सूक्ष्मजीवाणूंची विर्जने तयार करतो. या कामात तज्ञ आणि अनुभवी व्यक्तींचे मार्गदर्शन आणि मदत मिळत आहे. किंबहुना अशा संशोधकांची एक टीम या कंपनीत कार्यरत आहे. याशिवाय गावोगावीच्या शेतकरी संघटनांना मृदा परीक्षण, सेंद्रिय शेती, हरित गृह व्यवस्थापन या विषयात सल्ला सेवा पुरवित आहोत. आमच्या जैविक खते प्रकल्पात शेतकऱ्यांना त्यांच्या शेतावरच हि खते तयार करण्याचे प्रशिक्षण देखिल आम्ही देत आहोत. संशोधनाच्या पुढच्या टप्प्यात हि द्रवरूप खते गोळ्या किंवा चूर्णाच्या रुपात देण्याचा आमचा मानस आहे.
कृषिविषयक संशोधन आणि सर्वोत्तम तंत्रज्ञान सेवा देणे हे आमचे ब्रीद आहे.

**उदिष्टे:**

१. जैविक खते आणि जैव नियंत्रकाचे औद्योगिक उत्पादन.
२. विकासाकरिता संशोधन.
३. शेतकरी आणि महिला बचतगटांना प्रोत्साहन.
४. कुशल मनुष्यबळाची निर्मिती.

**बलस्थाने:**

१. उच्चशिक्षित तांत्रिक सल्लागार.
२. संशोधनावर आधारित उत्पादने.
३. शास्त्रज्ञांचा सल्लागार समितीत समावेश.
४. संशोधनांची भक्कम पार्श्वभूमी.
५. अनेक शिक्षण-संशोधन संस्थांची सामंजस्य करार.

**कंपनीचे भागीदार:**

**प्रोप्रा.:** अमेय महेंद्र रांजेकर

**तांत्रिक सहभागी:**

१. कमलाकर य. सोनकांबले बी.एसस्सी. (सूक्ष्मजीवशास्त्र, रसायनकशास्त्र, वनस्पतीशास्त्र), एम.एसस्सी. (सूक्ष्मजीवशास्त्र)•

२. अपूर्व म. रांजेकर बी.टेक. (रासायनिक इंजिनियरिंग), एम.टेक (नॅनो टेक्नॉलॉजी) ,चालू पीएच.डी. (ग्रीन टेक्नॉलॉजी)•

३. चैतन्य इनामदार एम.एसस्सी. (सूक्ष्मजीवशास्त्र).

४. कोमल अधवडे एम.एसस्सी. (सूक्ष्मजीवशास्त्र).

५. माधुरी म. रांजेकर एम.एसस्सी. (सूक्ष्मजीवशास्त्र).

६. नागनाथ क. रांजेकर बी.एसस्सी. (अॅग्री).

**तांत्रिक सल्लागार:**

१. डॉ. दिपक वेदपाठक एम.एसस्सी. पीएच.डी. (सूक्ष्मजीवशास्त्र).

२. डॉ. महेंद्र रांजेकर एम.एसस्सी., एम.फिल., पीएच.डी. (सूक्ष्मजीवशास्त्र).

३. डॉ. जयंत खेर एम.एसस्सी., पीएच.डी. (रसायनशास्त्र).